

हिंजवडीसह सात गावे महापालिकेत घेण्याची हीच योग्य वेळ

e Paper

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in | शुक्रवार दिनांक 27/06/२०२५ | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 142 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# राज्यात पायाभूत सोयी सुविधेचा प्रकल्प तीन वर्षात पूर्ण करावा - मुख्यमंत्री

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई : राज्यात यापुढे कुठलाही पायाभूत सोयी सुविधेचा प्रकल्प रखडणार याची दक्षता घेत पुढील तीन वर्षात प्रकल्प पूर्ण करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. ठाणे ते बोरिवली दुहेरी बोगदा प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करावे. दुहेरी बोगदा प्रकल्प डिसेंबर २०२८ पर्यंत पूर्ण करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

ठाणे ते बोरिवली दुहेरी बोगदा प्रकल्पाचा आढावा मुख्यमंत्र्यांनी आज विधानभवनातील कॅबिनेट सभागृहात घेतला. यावेळी ते बोलत होते. यावेळी बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, दुहेरी बोगदा हा ११.८४ किलोमीटर लांबीचा असणार आहे. त्यामुळे बोगद्यात हवा खेळती राहिली पाहिजे. त्यासाठी



संजय गांधी राष्ट्रीय उद्यानमधील अतिरिक्त जागा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही तातडीने करावी.

प्रकल्पाच्या निर्मितीसाठी वन विभागाची दुसऱ्या टप्प्यातील परवानगी, रात्रीला काम करण्याची परवानगी घेण्यात यावी. बोरिवली बाजूकडील काम गतीने पुढे जाण्यासाठी आणि या बाजूकडील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी धडक कार्यक्रम राबवून एक महिन्यात कार्यवाही पूर्ण करावी.

यंत्रणांनी समन्वय ठेवून प्रकल्पग्रस्तांना भाडे देऊन अथवा अन्य गृहनिर्माण प्रकल्पात पुनर्वसनासाठी अधिकाऱ्याची नियुक्ती करावी.

सबंधित अधिकाऱ्याने एक महिना कारवाई करीत पुनर्वसन पूर्ण करावे. बोरिवली बाजूकडील अदानी, टाटा पॉवर प्रकल्पातील आवश्यक असलेल्या जमिनीचे संपादन करावे. तसेच भूमिगत वीज वाहिन्या टाकण्यासाठी अदानी पॉवर कंपनीला रस्त्याचे अंतिम नियोजन द्यावे, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

बैठकीत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी यांनी सादरीकरण केले.

बैठकीस मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुंबई मनपा आयुक्त भूषण गगराणी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अतिरिक्त महानगर आयुक्त अश्विन मुदगल, अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक रामराव, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान संचालक अनिता पाटील, म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय जयस्वाल, ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, ठाणे मनपा आयुक्त सौरभ राव आदी उपस्थित होते.

**थोडक्यात दुहेरी बोगदा प्रकल्पाविषयी..**

ठाणे ते बोरिवली दुहेरी बोगदा 11.84 किलोमीटर लांबीचा आहे. प्रकल्प दोन पॅकेज मध्ये उभारण्यात येणार आहे. बोरिवली बाजूने 5.75 किलोमीटर पॅकेज एक आणि ठाणे बाजूने 6.09 किलोमीटर पॅकेज दोन असणार आहे. पॅकेज एक मध्ये 6 हजार 178 कोटी आणि पॅकेज दोन मध्ये 5 हजार 879 कोटी अशाप्रकारे एकूण 12 हजार 57 कोटी रुपयांचा खर्च या प्रकल्पाला अपेक्षित आहे.

प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर कार्बन उत्सर्जन 1.4 लाख मॅट्रिकने टन प्रतिवर्ष कमी होणार आहे. सध्याच्या रस्त्याने ठाणे ते बोरिवली जायला एक ते सव्वा तास लागतो.

बोगदा पूर्ण झाल्यानंतर हा कालावधी 15 मिनिटांवरती येणार आहे. तसेच मोठ्या प्रमाणावर इंधनही वाचणार आहे.

# येत्या 30 जूनपासून महाराष्ट्र विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन !

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई : महाराष्ट्र विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन ३० जून ते १८ जुलै या कालावधीत मुंबईत पार पडणार असल्याची घोषणा विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत करण्यात आली.विधानभवन येथे आयोजित विधानमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीला विधान परिषद सभापती प्रा.राम शिंदे,




विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, उच्च व तंत्र शिक्षण व संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, विधानसभा सदस्य दीपक केसरकर, भास्कर जाधव, नितीन राऊत, जितेंद्र आव्हाड, अमीन पटेल, विधानपरिषद सदस्य भाई जगताप, प्रवीण दरेकर, प्रसाद लाड, श्रीकांत भारतीय व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत अधिवेशनाच्या नियोजनावर चर्चा करण्यात आली. विधिमंडळाचे सचिव जितेंद्र भोळे यांनी कामकाजाची माहिती दिली.

# हिंजवडीसह सात गावे महापालिकेत घेण्याची हीच योग्य वेळ

## खासदार श्रीरंग बारणे यांची राज्य शासनाकडे मागणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी - महापालिकेच्या हद्दी लगत आणि विकासापासून वंचित असलेल्या हिंजवडी, माण, मारूजी, जांबे, नेरे, सांगवडे, गहुंजे ही सात गावे महापालिका घेण्याची हीच योग्य वेळ आहे. या गावांमध्ये नियोजनबद्ध विकास होत नाही, बकालपणा वाढत आहे. अनधिकृत बांधकामे वाढत असून नैसर्गिक नाले बुजविले जात आहेत. त्यामुळे हिंजवडीतील रस्ते जलमय होत आहेत. त्यासाठी निवडणुकीपूर्वी ही गावे पिंपरी-चिंचवड महापालिकेत घ्यावीत अशी मागणी मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी राज्य शासनाकडे केली आहे.

याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन दिले आहे. त्यात खासदार बारणे यांनी म्हटले आहे की, महापालिका हद्दीलगत हिंजवडी, मारूजी, नेरे, जांभे, सागंवडे, गहुंजे ही गावे आहेत. या गावांमध्ये मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाले आहे.



त्याठिकाणी मुलभूत सुविधांचा अभाव आहे. आयटीनगरी असलेल्या हिंजवडीचा विकास होणे गरजेचे आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे ग्रामपंचायतीला नागरिकांना सुविधा देणे शक्य होत नाही. सुविधांसाठी नागरिकांनी गावांचा महापालिकेत समावेश करण्याची मागणी केली आहे. मावळ, मुळशी तालुक्यात असलेली ही गावे महापालिकेच्या अगदी जवळ आहेत. या भागात अनधिकृत बांधकामे वाढली आहेत. नैसर्गिक नाले बुजविले जात असून वळविले जात आहेत. त्यामुळे यंदाच्या पावसाळ्यात हिंजवडी जलमय झाली. नदीलाही गटारीचे स्वरूप आले आहे. या गावांची जबाबदारी पीएमआरडीएकडे आहे. त्यांच्याकडे मनुष्यबळ कमी आहे. बांधकामावर नियंत्रण ठेऊ शकत नाही. त्यामुळे या परिसराला बकालपणा येत आहे. वाहतूक कोंडी, विविध समस्यांमुळे या भागातील नागरिक पिंपरी-चिंचवडमध्ये राहण्यास प्राधान्य देत आहेत. हिंजवडी नाशिक फाटा ते चाकण अशी मेट्रो होणार आहे. या भागाचा विकास होत आहे. त्यामुळे ही गावे तत्काळ महापालिकेत घेणे गरजेचे आहे.

हिंजवडी, माण या क्षेत्रात मोठ्या भागत आयटी पार्क आहे. देशभरातील नागरीक येथे येतात. वाढते नागरीकरण, सुविधांचा अभाव, वाहतुकीची समस्या या गोष्टींचा विचार करून ही गावे महापालिकेत येण्याची आवश्यकता आहे. गहुंजे या ठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडियम आहे. या गावात सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प पुरेसे नसल्याने अशुद्ध पाणी थेट नदीपात्रात सोडले जाते. त्यामुळे पवना नदीचे प्रदुषण वाढले आहे. गावांचा विकास, नागरीकांना सर्व सोयी-सुविधा मिळाव्यात आणि अनाधिकृत बांधकाम रोखण्याच्या दृष्टीकोणातून हिंजवडी, माण, मारूजी, नेरे, जांबे, सांगवडे आणि गहुंजे यां गावांचा महापालिका क्षेत्रात समावेश करावा अशी मागणी खासदार बारणे यांनी केली.

महापालिका निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध होण्यास वेळ आहे.

नोव्हेंबर- डिसेंबरमध्ये निवडणूक होण्याची शक्यता आहे. सुरुवातीला जिल्हा परिषदेच्या निवडणुका होतील असे दिसते. त्यामुळे प्रभाग रचना होण्यापूर्वी गावे समाविष्ट करण्याचा निर्णय घ्यावा. जेणेकरून या गावासह प्रभाग रचना करता येईल. निवडणुकीत नगरसेवक निवडून येतील. ही गावे महापालिकेत आल्यास नियोजनबद्ध विकास करणे सोईचे होईल, असेही खासदार बारणे म्हणाले.

# हिंजवडीचा पिंपरी-चिंचवड महापालिकेत समावेश व्हावा

## आमदार शंकर जगताप यांचा ठाम पाठिंबा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

हिंजवडी - हिंजवडीचा पिंपरी-चिंचवड महापालिकेत समावेश व्हावा, या मागणीसाठी सुरू असलेल्या ऑनलाईन सह्यांच्या मोहिमेला आता राजकीय पाठबळ मिळाले आहे. चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांनी या मोहिमेला ठाम शब्दांत पाठिंबा जाहीर केला असून, "या प्रश्नावर मी हिंजवडीतील नागरिकांच्या सोबत आहे," अशी स्पष्ट भूमिका त्यांनी घेतली आहे. हिंजवडी आयटी पार्क परिसरात सध्या नागरिक व आयटीयन्स रस्त्यांची अत्यंत खराब अवस्था, वाहतूक कोंडी




आणि अपुऱ्या नागरी सुविधा यामुळे त्रस्त झाले आहेत. या गंभीर समस्यांवर कायमस्वरूपी उपाय व्हावा, यासाठी वाकड-पिंपरी चिंचवड रहिवासी विकास व कल्याण संस्थेचे (WPRDWA) अध्यक्ष सचिन लोंढे यांच्या पुढाकाराने #UNCLOGHinjawadiITPar k या मोहिमेंतर्गत ऑनलाईन सह्यांची मोहीम सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेमार्फत हिंजवडीचा पिंपरी-चिंचवड महापालिकेत समावेश व्हावा, अशी जोरदार मागणी केली जात आहे. या पार्श्वभूमीवर आमदार शंकर जगताप यांनी म्हटले की, “हिंजवडीतील नागरिक आणि आयटीयन्स प्रश्न मी समजून घेतले आहेत. या भागातील नागरी सुविधांची अवस्था अत्यंत वाईट असून, त्यावर पालिकेच्या माध्यमातूनच प्रभावी उपाय होऊ शकतात. म्हणूनच मी या मागणीचे पूर्ण समर्थन करतो आणि यासंदर्भात प्रशासनाकडेही पाठपुरावा करणार आहे.”

ऑनलाईन सह्यांची ही मोहीम नागरिकांच्या सहभागामुळे दिवसेंदिवस बळकट होत आहे. यामध्ये सहभागी झालेले नागरिक सांगतात की, हिंजवडीसारखा आयटी हब महानगरपालिका क्षेत्रात आला तर रस्ते, वाहतूक, पाणी, कचरा व्यवस्थापन यासारख्या मूलभूत सुविधा अधिक सक्षम होतील. यामुळे लाखो आयटीयन्सना दिलासा मिळेल, तसेच आयटी उद्योगांच्या विकासालाही चालना मिळेल.

या मागणीला आता आमदार शंकर जगताप यांचा पाठिंबा मिळाल्यामुळे या आंदोलनाला नवे राजकीय वजन प्राप्त झाले आहे. लवकरच या मागणीसाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि नगरविकास विभागाकडे अधिकृत निवेदन देण्यात येणार असून, नागरिक प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसादाची अपेक्षा करत आहेत.

# छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक पुरस्काराचे वितरण मंगळवारी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे: स्वर्गवासी कमलाबाई रसिकलाल धारिवाल पुरस्कृत 'छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक स्पर्धा पुरस्कार' वितरण सोहळा व दिवाळी, ख्रिसमस, रमजान निमित्ताने प्रकाशित होणाऱ्या अंकांच्या प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. १ ते ४ जुलै २०२५ या कालावधीत सकाळी ११ ते सायंकाळी ८ या वेळेत आयोजित प्रदर्शनाचे उद्घाटन मंगळवारी (ता. १ जुलै) सकाळी ११ वाजता बालगंधर्व रंगमंदिराच्या कलादालनात माजी संमेलनाध्यक्ष व संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते, धारिवाल इंडस्ट्रीजचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाशशेठ धारिवाल यांच्या हस्ते होणार आहे. पुरस्काराचे यंदा नववे वर्ष असून, पुरस्कार वितरण सोहळा संध्याकाळी ५ वाजता गणेश सभागृह, टिळक रस्ता पुणे येथे प्रसिद्ध अभिनेत्री डॉ. निशिगंधा वाड, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष मिलिंद जोशी, ज्येष्ठ लेखिका सिसिलिया कार्व्हालो, संमेलनाचे माजी अध्यक्ष भारत सासणे यांच्या उपस्थितीत होणार आहे, अशी माहिती दिनमार्क पब्लिकेशनचे दिनकर शिलेदार यांनी दिली.



प्रसंगी साहित्यिक माधव राजगुरू उपस्थित होते.

दिनकर शिलेदार म्हणाले, "ही स्पर्धा दिवाळी अंकांसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर घेण्यात येते. यंदा स्पर्धेत ख्रिसमस सणाच्या निमित्ताने वसई येथून प्रकाशित होत असलेल्या अंकांच्या प्रवेशिका, तसेच रमजान सणानिमित्त प्रकाशित होणार 'नब्ज' हा अंक स्पर्धेसाठी स्वीकारण्यात आला आहे. देशभरातून प्रकाशित होणाऱ्या दिवाळी अंकांची माहिती पुणेकरांना व्हावी, यासाठी या अंकांचे प्रदर्शन भरविण्यात येत आहे. कादौडी, पाशिहार हे अंक ख्रिसमसमध्ये कादौडी भाषेत प्रसिद्ध होतात. स्पॅनिश लोक भारतात ५०० वर्षांपूर्वी आले होते; तेव्हा कादौडी भाषेचा जन्म झाला. कादौडी भाषा काही लोकांची बोली भाषा म्हणून प्रचलित झाली. गीत, संक्रमण अशासारखे अंक मराठी भाषेतच प्रसिद्ध होतात. त्यामुळे त्यांना या स्पर्धेत सामावून घेण्यात आले. पुढील वर्षी पश्चिम बंगालमधून बंगाली भाषेतील दुर्गा पूजेनिमित्त प्रसिद्ध होणारे अंक सामील करून घेतले जाण्याचा मानस आहे. यंदा स्पर्धेमध्ये २३४ प्रवेशिका स्वीकारण्यात आल्या आहेत. अमेरिकेतून दोन दिवाळी अंक स्पर्धेत सहभागी झाले आहेत. अशा प्रकारची स्पर्धा आणि प्रदर्शन भारतात प्रथमच सादर करण्याचा मान दिनमार्क पब्लिकेशन्सला मिळणार आहे. काही अंक पूनम एजन्सीच्या श्रीकांत भुतडा यांच्या सहकार्यातून मिळवणार असून, ३०० पेक्षा जास्त अंक प्रदर्शनात असतील, असा विश्वास आहे." पुण्यातून मिनाज लाटकर या गेली तीन वर्षे रमजाननिमित्त 'नब्ज' नावाचा अंक मराठी भाषेत देवनागरी लिपीत सादर करीत आहेत. कोणत्याही सणानिमित्त प्रसिद्ध होणारे अंक वाचन संस्कृतीचा आधारस्तंभ ठरतात. विविध प्रकारची माहिती त्यामुळे उपलब्ध होते. यामुळेच अंकांचे प्रदर्शन भरवण्याचा घाट घालण्यात आला आहे. इथे धर्माचा विचार बाजूला ठेवला आहे. फक्त वाचन संस्कृतीवर भर देण्यात येतो. आक्षेपार्ह लिखाण केले जात नाही ना, याची काळजी घेण्यात येते. यात कुणाच्या भावना दुखावण्याचा विचार मनात आलेला नाही. त्यातूनही कुणाच्या भावना दुखावल्या गेल्या तर मी त्याची आगाऊ माफी मागतो. केवळ वाचकांना चांगले खाद्य मिळावे, हाच त्यामागचा विचार आहे, असे दिनकर शिलेदार यांनी नमूद केले.

**छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक स्पर्धा पुरस्कार**

**सर्वोत्कृष्ट दिवाळी अंकाचे दोन्ही पुरस्कार यावर्षी सकाळ माध्यम समूहाच्या 'अवतरण' आणि 'अँग्रोवन' या दिवाळी अंकाने पटकावले.**

**उत्कृष्ट मुखपृष्ठाचा मान लोकमत समूहाच्या 'दीपोत्सव' दिवाळी अंकाला मिळाला आहे. त्याचे श्रेय सुप्रसिद्ध चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी यांना जाते. त्याशिवाय उत्कृष्ट दिवाळी अंकांचे प्रथम, द्वितीय आणि उत्तेजनार्थ पुरस्कार असे एकूण ४२ पुरस्कार यावर्षी देण्यात येणार आहेत.**

**अनेक पुरस्कारांत महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता, दिव्यमराठी या वृत्तपत्रांनीही उल्लेखनीय कामगिरी केली आहे.**

# राउंड टेबल इंडियातर्फे दृष्टिहीनांसाठी कार रॅलीचे आयोजन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : सामाजिक समावेशकतेला चालना देण्यासाठी राउंड टेबल इंडिया या संस्थेतर्फे पुण्यात दृष्टिहिनांसाठी 'बियाँड साईट', ही आगळीवेगळी कार रॅली आयोजित करण्यात आली आहे. ही कार रॅली येत्या रविवारी (ता. २९) रोजी सकाळी १० वाजता द फर्न क्लब, अमनोरा पार्क, पुणे येथे होणार आहे, अशी माहिती राउंड टेबल इंडियाचे (एरिया १५) अध्यक्ष अंशुल मंगल यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रसंगी पूना ब्लाइंड मेन्स असोसिएशनच्या प्रकल्प संचालिका डॉ. आर्वा चिनीकमवाला, राउंड टेबल इंडियाचे सुमित गुप्ता, रोनक पतोडीया, मनन शहा, गुरप्रीत सिंग, इंद्रोनील चॅटर्जी, तरुण सिंग आदी





उपस्थित होते.अंशुल मंगल म्हणाले, "या रॅलीमध्ये ५० कारचालक सहभागी होणार आहेत. दृष्टिक्षम व्यक्ती कार चालवणार आहे, तर दृष्टिहीन व्यक्ती स्मार्टफोनवरून मिळणाऱ्या सूचना ऐकून ड्रायव्हरला मार्ग दाखवणार आहे. दोन तासाचा वेळ, २४ किलोमीटर अंतर असलेल्या या रॅलीचा मार्ग अमनोरा पार्क, खराडी बायपास, शक्ती स्पोर्ट्स, हयात इन्स्टा, गोल्ड ऍडलॅब चौक, वर्दे सोसायटी, गुंजन टॉकीज, कोरेगाव पार्क, वेस्टीन हॉटेल, मुंढवा चौक, मगरपट्टामार्गे अमनोरा पार्क असा आहे. 'बियाँड साइट' ही केवळ स्पर्धा नाही, तर दृष्टिहीन व्यक्तींच्या कौशल्यावर विश्वास दाखवण्याचा आणि त्यांच्याविषयी असलेल्या रूढ कल्पनांना आव्हान देण्याचा उपक्रम आहे. संथ गतीने शहरातील ठराविक मार्गावर ही रॅली पार पडणार असून, दृष्टिहीन व्यक्तींची दिशा ज्ञान, स्थानिक समज आणि संवाद कौशल्ये यांचा प्रत्यय इथे येणार आहे.""राउंड टेबल इंडियामध्ये आम्ही संधी निर्माण करत समाजातील वंचित घटकांना सक्षम करण्यावर विश्वास ठेवतो. 'बियाँड साइट' ही आमच्या समावेशकतेवरील कटिबद्धतेचे आणि दृष्टिहीनांच्या क्षमतेवर असलेल्या विश्वासाचे प्रतीक आहे. या उपक्रमामध्ये विविध पार्श्वभूमीचे नागरिक सहभागी होणार असून, ड्रायव्हिंगबद्दलची आवड आणि दृष्टिहीन समुदायाबद्दलचा आदर यांच्या जोरावर ते एकत्र येणार आहेत. या रॅलीच्या माध्यमातून केवळ मनोरंजन नव्हे, तर 'अपंगत्व म्हणजे असमर्थता नव्हे' हा सामाजिक संदेशही दिला जाणार आहे," असेही त्यांनी नमूद केले.ही फक्त रॅली नाही, तर दृष्टिहीनांच्या अद्भुत कौशल्यांना ओळख देणारे व्यासपीठ आहे. 'बियाँड साइट'च्या माध्यमातून अनेकांचे दृष्टिकोन बदलतील आणि दृष्टिहीनांसाठी अधिक समावेशक संधी निर्माण होतील, अशी आशा आहे," असे डॉ. आर्वा चिनीकमवाला यांनी सांगितले. या उपक्रमाविषयी अधिक माहितीwww.roundtableindia.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# गांजा विक्री प्रकरणी एकजण गजाआड; 12 किलो गांजा जप्त

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : लोहगाव परिसरात गांजा विक्रीसाठी आलेल्या एकाला विमानतळ पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडून तीन लाख रुपयांचा १२ किलो गांजा जप्त करण्यात आला. अखिलेश गरीब मंडल (वय ३४, रा. लोहगाव) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी त्याच्याविरुद्ध



अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.लोहगावमधील कर्मभूमीनगर परिसरात एकजण थांबला असून त्याच्याकडे गांजा असल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक नितीन राठोड यांना मिळाली. त्यानंतर तपात पथकाने सापळा लावून त्याला ताब्यात घेतले. त्याची झडती घेण्यात आली. तेव्हा त्याच्याकडील कापडी पिशवीत सुमारे १२ किलो गांजा सापडला, जप्त करण्यात आलेल्या गांजाची किंमत तीन लाख रुपये आहे.

मंडल हा बांधकाम मजूर आहे. त्याने गांजा कोठून आणला, याद्दष्टीने पोलिसांकडून तपास करीत आहे.

# पुण्यात पाच नवीन सायबर पोलीस ठाण्यांच्या निर्मितीचा प्रस्ताव

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शहरातील वाढत्या सायबर गुन्ह्यांची संख्या विचारात घेऊन आणखी पाच नवीन सायबर पोलीस ठाण्यांच्या निर्मितीचा प्रस्ताव पोलीस महासंचालकांकडे पाठविण्यात आला आहे. नवीन सायबर पोलीस ठाण्यांसाठी पायाभूत सुविधांसह अतिरिक्त पोलीस कर्मचाऱ्यांची मागणी करण्यात आली आहे, अशी माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली.

'शिवाजीनगर पोलीस मुख्यालयात सध्या सायबर पोलीस ठाणे आहे. सायबर पोलीस ठाण्यात दररोज किमान



१०० ते १५० तक्रारअर्ज दाखल होतात. शहरातील वाढते सायबर गुन्हे, फसवणुकीचे प्रमाण विचारात घेता शहरात आणखी पाच नवीन पोलीस ठाण्यांची निर्मिती करण्याची गरज आहे. त्यासाठी अतिरिक्त पोलीस कर्मचारी आणि पायाभूत सुविधा लागणार आहेत. याबाबत पोलीस महासंचालक कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे', असे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी नमूद केले.

शहराचा वाढता विस्तार, तसेच नवीन पोलीस ठाण्यांचा समावेश विचारात घेता आणखी १ हजार ६०० पोलीस कर्मचारी उपलब्ध करून देण्यात यावेत, असा प्रस्ताव देण्यात आला होता. त्यांपैकी ८०० पोलीस कर्मचारी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. पुणे पोलीस दलात आणखी एक हजार पोलीस कर्मचारी उपलब्ध करून देण्यात यावेत, असा प्रस्ताव नव्याने पाठविण्यात आला आहे.

# 30 जून रोजी थेरगाव बंद ; प्रशासनाचा व राज्य शासनाचा जाहीर निषेध

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड : पिंपरी चिंचवड महानगरपालिका वतीने शहर विकास आराखड्यात २४ मीटरचे रस्ते तसेच १२मीटर ,१५ मीटर डीपी , ३० मीटर, एच सी एम टी आर रस्ते व इतर आरक्षणे टाकली आहे सदरची आरक्षणे ही हुकूमशाही पद्धतीने टाकण्यात आले असल्याचा आरोप थेरगाव वासियांच्या वतीने करण्यात आला आहे.थेरगाव मध्ये शंभर टक्के दाट वस्तीवरून २४ मीटर ,बारा मीटर, पंधरा मीटर डीपी व ३० मीटर एच सी एम टी आर रोड च्या विरोधात थेरगाव मधील रहिवासी, सिटी सर्वे नंबर, प्रॉपर्टी कार्ड मिळविण्यासाठी मोर्चे आंदोलन व गाव बंद करून उपोषण करून थेरगाव मध्ये लाक्षणिक कडकडीत बंद ठेवण्याचा निर्णय रहिवाशी वतीने घेण्यात आला आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे



आयुक्त प्रशासन व राज्य शासनाने थेरगाव परिसरातील स्थानिक नागरिकांना विचारात न घेता व भौगोलिक परिस्थितीचा सर्वे न करता गुगल मॅप वरून अन्यायकारक हुकूमशाही पद्धतीने आरक्षणे टाकली आहे ती तात्काळ रद्द करण्यात यावी याकरिता हे थेरगाव बंद आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती थेरगाव बहुउद्देशीय रहिवासी संघाच्या वतीने देण्यात आली आहे.३० जून रोजी थेरगाव मधील १६ नंबर बस स्टॉप ते काळेवाडी फाटा ते श्रीनगर पासून गावठाण शिवस्मारक अशी पदयात्रा होणार आहे.

सोमवारी सकाळी ११ वाजता ही पदयात्रा सुरू होणार असल्याची माहिती थेरगाव वासियांच्या वतीने देण्यात आली आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
शुक्रवार दिनांक 27/06/२०25
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# ज्योतिष वास्तू विश्व संशोधन केंद्राचा चतुर्थ पदवी प्रदान सोहळा रविवारी

## शारदा,रत्नमाला पुरस्कारांसह विविध पुरस्कारांचे होणार वितरण

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पुणे : ज्योतिष वास्तू विश्व संशोधन केंद्र, पुणे यांच्या वतीने चतुर्थ पदवी प्रमाणपत्र वितरण व पुरस्कार सोहळ्याचे भव्य आयोजन रविवार, दिनांक २९ जून २०२५ रोजी करण्यात आले आहे. हा सोहळा पद्मावती येथील विणकर सभागृहात सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत पार पडणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष वेदमूर्ती उमेश रमेश कुलकर्णी गुरुजी यांनी पत्रकार परिषदेत दिली.पत्रकार परिषदेस संस्थेचे मार्गदर्शक व ज्येष्ठ उद्योगपती मनोज राठी, संपर्कप्रमुख श्रुती योगेश पिसे हे मान्यवर देखील उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी १० वाजता पदवी प्रमाणपत्र वितरण सोहळ्याने होणार आहे. या वेळी वास्तु विशारद, लोलक विशारद, अंक विशारद आणि वास्तु भूषण अभ्यासक्रम पूर्ण करणा-या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरित केले जाणार आहे. या सोहळ्यास ज्योतिष व अध्यात्म क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. या वर्षीच्या पदवी वितरण सोहळ्यात १२० हून अधिक विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व गौरवचिन्ह प्रदान करण्यात येणार आहे.

कार्यक्रमात सकाळी १० वाजता पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होईल. यामध्ये विद्यावाचस्पती ज्येष्ठ गाणपत्य डॉ. स्वानंद पुंड महाराज यांना शारदा पुरस्कार, अभिनव ज्योतिष मंडळ सोलापूर या संस्थेचे अध्यक्ष ज्येष्ठ पंचांग कर्ते मोहन दाते यांना रत्नमाला पुरस्कार, योगीराज वेद विज्ञान आश्रम या पाठशाळेचे अध्यक्ष अश्वमेधयाजी चैतन्य नारायण काळे गुरुजी यांना वेद संवर्धन प्रेरणा पुरस्कार, वेदमूर्ती दत्तात्रय मनोहर साधले गुरुजी यांना वेदमार्ग दीपस्तंभ पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्कार सोहळ्याचे उद्घाटन ज्येष्ठ ज्योतिषतज्ञ शुभांगिनी पांगारकर यांच्या हस्ते होणार आहे. यानंतर पुरोहितांचे मंगल मंत्र पठण, सान्वी फुंडकर यांचे सुसंस्कृत नृत्य आणि सन्मान समारंभ पार पडणार आहे. दुपारी विशेष सत्रात विद्यार्थ्यांचे मनोगत तसेच प्रॅक्टिकल वास्तू व्हिजीट आयोजित करण्यात आली आहे. ज्योतिष वास्तू विश्व संशोधन केंद्र हे गेल्या अनेक वर्षांपासून वास्तूशास्त्र, अंकशास्त्र व ज्योतिषशास्त्राच्या क्षेत्रात गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण देत आहे. आजवर या संस्थेतून ३,००० पेक्षा अधिक विद्यार्थी यशस्वीरीत्या प्रशिक्षित होऊन समाजसेवेच्या माध्यमातून स्वत:चे यशस्वी करियर घडवत आहेत.

# महापालिका शाळांतील विद्यार्थ्यांना 'पीएमपीएमएल'चे मोफत पास द्या!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत






पिंपरी - इयत्ता ५ ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपीएमएल) मोफत बस पास सुविधा सुरू करणेबाबत तात्काळ कार्यवाही करावी. सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रोत्साहन मिळण्याकामी महापालिका प्रशासनाने पुढाकार घ्यावा, अशी मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महानगर क्षेत्रामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. या विद्यार्थ्यांपैकी अनेकांना दररोज शाळा, महाविद्यालये किंवा शिकवणी वर्गांमध्ये पोहोचण्यासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर अवलंबून राहावे लागते. सध्या पीएमपीएमएल ही सेवा या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची ठरत आहे. यापूर्वी इयत्ता ५ ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता सवलतीच्या दरामध्ये पास सुविधा होती. ती सुविधा यावर्षी बंद असल्याचे समजले.वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर अनेक विद्यार्थ्यांच्या पालकांवर बसभाड्याचा आर्थिक बोजा वाढत आहे. शिक्षणासाठी आवश्यक असलेले साहित्य, शुल्क आणि इतर खर्च यामध्ये बस भाड्याचा भारदेखील मोठा ठरतो. त्यामुळे अनेक होतकरू आणि गरजू विद्यार्थ्यांसमोर अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे शासकीय आणि खासगी शाळांमधील इयत्ता ५ ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी २०२५-२६ शैक्षणिक वर्षाकरिता 100 टक्के मोफत पास सुविधा सुरू करावी, अशी आमची आग्रही मागणी आहे.पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या बस सेवेवर पिंपरी-चिंचवड क्षेत्रातील सर्व विद्यार्थ्यांना मोफत पास सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी.

महापालिकेच्या सामाजिक उत्तरदायित्वाच्या अनुषंगाने या योजनेची अंमलबजावणी केल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक आयुष्य अधिक सुलभ व प्रेरणादायी ठरेल, असा विश्वासही आमदार लांडगे यांनी व्यक्त केला आहे.पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून शहरात प्राथमिक आणि माध्यमिक शाळा संचलित केल्या जातात.

त्यामध्ये 105 प्राथमिक आणि 18 माध्यमिक शाळांमध्ये सुमारे 42 हजार अधिक विद्यार्थी शिक्षण घेतात. गतवर्षी विद्यार्थ्यांना पीएमपीएमएल बस प्रवासासाठी 75 टक्के सवलत योजना होती.

यावर्षी 100 टक्के मोफत पास सुविधा द्यावी. ज्यामुळे महापालिका हद्दीलगतच्या विद्यार्थ्यांना बस सुविधा मिळेल आणि शैक्षणिक प्रोत्साहन मिळणार आहे. महापालिका प्रशासन याबाबत सकारात्मक कार्यवाही करेल, असा विश्वास आहे.- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
शुक्रवार दिनांक 27/06/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# “न्याय, माणुसकी आणि विद्रोहाचा हुंकार ॲड.दिपक साबळे”

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

विशेष लेख



ॲडव्होकेट दिपक साबळे हे एम.ए., एल.एल.बी. शिक्षण घेऊन कायद्याच्या क्षेत्रात कार्यरत असलेले एक प्रगल्भ, संवेदनशील आणि सामाजिक भान असलेले व्यक्तिमत्त्व आहे. वकिलीच्या माध्यमातून ते समाजातील पीडित, अन्यायग्रस्त आणि दुर्लक्षित घटकांसाठी न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने झटत असतात. दिवाणी, फौजदारी व कौटुंबिक कायद्यात विशेष प्राविण्य मिळवत त्यांनी घटस्फोट, 498A , मुलांची कस्टडी, निर्वाहभत्ता व घरगुती हिंसाचारासारख्या प्रकरणांमध्ये अनेकांना न्याय मिळवून दिला आहे. पुणे न्यायालयात त्यांनी एका पीडित महिलेसाठी लढत न्याय मिळवून दिला आणि या कार्यातून त्यांच्याकडे अनेक गरजूंनी आपला विश्वास ठेवला.

ते फक्त कायद्याचे व्यावसायिक नाहीत, तर समाजातील प्रश्नांवर सतत विचार करणारे एक सजग नागरिकदेखील आहेत. कोरोना काळात त्यांनी झोपडपट्टीतील गरीब कुटुंबांना घरपोच अन्न, रेशन किट्स दिले आणि मोफत कायदेशीर सल्लाही उपलब्ध करून दिला. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना सोळा वेगवेगळे पुरस्कार, त्यात आयकॉनिक इंडियन्स अवार्ड, मेट्रोसिटी विशेष सन्मान पुरस्कार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय सन्मान पुरस्कार बहाल करण्यात आला.

वकील असण्यासोबतच दिपक साबळे हे एक अनुभवी पत्रकारही आहेत. तब्बल दहा वर्षे पत्रकारितेमध्ये कार्य करत त्यांनी समाजातील अन्याय, भ्रष्टाचार, लाचलुचपत, प्रशासनातील त्रुटी, महिला अत्याचार, शिक्षणातील असमतोल यावर धारदार लेखन केलं. पत्रकारितेचा हा अनुभव त्यांना समाजाच्या खऱ्या प्रश्नांची जाणीव करून देतो आणि तेच त्यांच्या वकिलीच्या भूमिकेतून अधिक प्रभावीपणे प्रतिबिंबित होतं.

केवळ न्यायालयातच नव्हे, तर रस्त्यावरही ते अन्यायाविरोधात ठाम भूमिका घेतात. महिलांच्या हक्कांसाठी, गरिबांच्या न्यायासाठी, आणि विशेषतः वकिलांवर होणाऱ्या अन्यायाच्या घटनांविरोधात त्यांनी आंदोलने, मोर्चे, निवेदने यांद्वारे संघर्ष केला आहे. “वकीलही नागरिक आहेत, त्यांचे हक्कही सुरक्षित असले पाहिजेत” हे भान त्यांनी समाजासमोर ठामपणे मांडले.

या संघर्षशील आणि संवेदनशील प्रवासाला त्यांनी लेखनातूनही अभिव्यक्ती दिली आहे. ‘हुंकार – एक विद्रोही सत्य’ हे त्यांचे पुस्तक म्हणजे समाजातील अन्याय, शोषण आणि व्यवस्थेतील विसंगतींवर दिलेला ठोस आणि विद्रोही प्रतिसाद आहे. ही केवळ एक पुस्तकरूप अभिव्यक्ती नाही, तर अंतर्मनातील असंतोषाचा एक ज्वलंत दस्तऐवज आहे, जो नव्या पिढीला सजग आणि जागरूक बनवण्याचे काम करतो.

दिपक साबळे यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे वकिली, पत्रकारिता आणि समाजसेवेचा त्रिवेणी संगम आहे. आज ते हजारो लोकांसाठी मार्गदर्शक, आधारवड आणि प्रेरणास्थान ठरले आहेत. त्यांच्या कार्यातून एक संदेश नेहमीच उमटतो –

“न्याय हा केवळ कायद्याचा विषय नसून, तो माणुसकीचा ही आहे.”

वाढदिवसानिमित्त ॲड. दिपक साबळे यांच्या न्यायासाठीच्या लढ्याला, सामाजिक जाणिवेला आणि लेखनातून उमटणाऱ्या विद्रोही हुंकाराला मन:पूर्वक शुभेच्छा!

# सोमाटणे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी शैलेश मुऱ्हे यांची निवड

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

सोमाटणे ग्रामपंचायत ही पवन मावळतली एक महत्त्वाची अशी ग्रामपंचायत आहे, पवन मावळतील अशा ग्रामपंचायती वर शैलेश मुऱ्हे यांची निवड झाल्याने सर्व स्तरावर त्यांचे अभिनंदन होत आहे,मावळत्या उपसरपंच आश्विनी मुऱ्हे यांनी राजीनामा दिल्याने ही जागा रिक्त झाली होती शैलेश मुऱ्हे यांच्या उपसरपंचपदी निवड झाल्याचे पत्र निवडणूक अधिकारी गोपीनाथ खोमणे व सरपंच स्वाती कांबळे यांनी दिलेनिवड झाल्यानंतर शैलेश मुऱ्हे म्हणाले सर्व सहकाऱ्यांनी माझ्यावर विश्वास दाखवुन मला काम करण्याची संधी उपलब्ध करून दिली, त्यानुसार सरकारच्या जास्तीत योजनाचा लाभ ग्रामस्थांना मिळवून देईल.

शैलेश मुऱ्हे यांची सोमाटणे ग्रामपंचायतिच्या उपसरपंचपदी निवड झाल्यानंतर एकता प्रतिष्ठान डोणे यांच्या वतीने सन्मान करण्यात आला. त्या समयी साळुंब्रे गावचे आदर्श मा. सरपंच धनंजयमामा विधाटे एकता प्रतिष्ठाण डोणेचे संस्थापक बाळासाहेब घारे, व त्यांचे सहकारी मित्र अमित वहिले बन्सीभाऊ राक्षे आदी उपस्थित होते

